# बातमीवृत्तांत

## महाराष्ट्र शासनाच्या नवलेखक अनुदान योजनेत साहित्य पाठविण्याचा कालावधी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून सन २०२५ या वर्षासाठी ज्याचे आजमितीपर्यंत एकही पुस्तक प्रकाशित झालेले नाही, अशा नवलेखकांच्या पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनाला अनुदान देण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. नवलेखकांना (१) कविता (६४ ते ९६ टाईप केलेली पृष्ठे - ८० कविता), (२) कथा (१२८ ते १४४ टाईप केलेली पृष्ठे - जास्तीत जास्त ४५००० शब्द), (३) नाटक/एकांकिका (६४ ते ९६ टाईप केलेली पृष्ठे - जास्तीत जास्त २८००० शब्द), (४) कादंबरी (१२८ ते १४४ टाईप केलेली पृष्ठे - जास्तीत जास्त ४५०००), (५) बालवाङ्मय (६४ ते ९६ टाईप केलेली पृष्ठे - जास्तीत जास्त २८०००) व (६) वैचारिक लेख/ललितलेख/चरित्र/आत्मकथन/प्रवास वर्णन (१२८ ते १४४ टाईप केलेली पृष्ठे - जास्तीत जास्त ४५००० शब्द) या सहा वाङ्मय प्रकारातील पहिल्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी वरील पृष्ठसंख्येच्या मर्यादेतील मुद्रित (टाईप) मजकुराला अनुदान देण्यात येईल. (वर उल्लेखिलेल्या किमान पृष्ठसंख्येपेक्षा कमी पृष्ठसंख्येचे तसेच कमाल पृष्ठसंख्येपेक्षा जास्त पृष्ठसंख्येचे मुद्रित पाठविल्यास सदर मुद्रिताचा या योजनेत विचार केला जाणार नाही) नवलेखकांनी आपले अप्रकाशित साहित्य मुद्रित स्वरुपात (टाईप केलेल्या) पाठवून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने केले आहे. नवलेखकांनी त्यांचे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या विहित कालावधीत पुढील पत्त्यावर पाठवावे. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी क्र. ०२२ २४३२ ५९३१. या योजनेसाठीचे माहितीपत्रक, विहित नमुन्यातील अर्ज आणि इतर तपशील महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या अंतर्गत 'नवलेखक अनुदान योजना २०२५ माहितीपत्रक व अर्ज' या शीर्षाखाली तसेच 'What's new' या अंतर्गत 'Navlekhak Grant Scheme Rules Book and Application Form' या शीर्षाखाली तसेच व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
# नवलेखक अनुदान योजना माहितीपत्रक
## नियम व अटी

मराठी भाषेतील नवलेखकांना ललित वाङ्मयाच्या प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान देण्याची योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे दरवर्षी कार्यान्वित केली जाते. ही योजना महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील फक्त मराठी नवलेखकांनाच लागू आहे. नवलेखक म्हणजे ज्याचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, असाच लेखक अभिप्रेत आहे. या योजनेखाली विविध ललित व ललितेतर साहित्याचा खालील गटात विचार करण्यात येईल.

| अ.क्र. | वाङ्मय प्रकार | **डेमी आकारातील (५.५" इंच × ८.५" इंच) अंदाजे छापील पृष्ठसंख्या** <br> **किमान** | | **कमाल** | |
|---|---|---|---|---|---|
| १ | कवितासंग्रह | ६४ | ते | ९६ | (८० कविता) |
| २ | कथासंग्रह | १२८ | ते | १४४ | (४५००० शब्द) |
| ३ | नाटक/एकांकिका | ६४ | ते | ९६ | (२८००० शब्द) |
| ४ | कादंबरी | १२८ | ते | १४४ | (४५००० शब्द) |
| ५ | बालवाङ्मय (काव्य, कथा, कादंबरी, नाटक/एकांकिका) | ६४ | ते | ९६ | (२८००० शब्द) |
| ६ | इतर प्रकारचे वैचारिक तसेच चरित्र, आत्मचरित्र, ललित स्वरुपाचे तसेच प्रवास वर्णनात्मक स्वरुपाचे लेखन | १२८ | ते | १४४ | (४५००० शब्द) |

या योजनेत साहित्य पाठविताना पुढील बाबी लेखकांनी लक्षात घेणे आवश्यक आहे :-

२) विहित पृष्ठसंख्येत बसणारी (वर उल्लेखिलेल्या किमान पृष्ठसंख्येपेक्षा कमी पृष्ठसंख्येच्या टंकलिखित प्रतीचा विचार या योजनेत विचार केला जाणार नाही) व मंडळाच्या नवलेखक अनुदान योजना समितीने किमान गुणवत्तेच्या निकषांवर निवडलेले लेखन तज्ज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात येईल.

३) या योजनेत अनुदानासाठी सादर करावयाच्या अर्जातील छायाचित्र स्वसाक्षांकित करुन सोबत जोडण्यात यावा. लेखक/कवीने हे स्वसाक्षांकित छायाचित्र न जोडल्यास त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

४) मंडळाकडे अनुदानासाठी पाठवावयाचे साहित्य (टाईप केलेले), स्वच्छ, शुद्ध, सुवाच्य, प्रचलित (सुधारित) शुद्धलेखनानुसार व कागदाच्या एकाच बाजूस टाईप केलेले (डेमी साईज - ५.५" इंच × ८.५" इंच) असावे. प्रस्तावना, अनुक्रमणिका एकूण लेखनाची पृष्ठसंख्या इत्यादी गोष्टींची पूर्तता करुन साहित्य व्यवस्थित बांधून पाठवावे. तसेच टाईप केलेल्या प्रतीवर पुस्तकाचे नाव, वाङ्मय प्रकार व लेखकाचा पत्ता लिहिलेला नसावा. मात्र टाईप केलेली प्रत सादर करताना लेखक/कवीने आपले नाव, पत्ता, शीर्षक, वाङ्मय प्रकार याबद्दलचा तपशील एका वेगळ्या कागदावर टंकलिखित करुन तो या कार्यालयास पाठवावा.

५) नवलेखकाला कोणत्याही एका वाङ्मय प्रकारात केवळ एकच टाईप केलेली प्रत सादर करता येईल.

६) अर्जासाठी कसलेही शुल्क (फी) अथवा टपाल पाठविण्याची जरुरी नाही. साहित्याची फक्त एक प्रत नोंदणी डाकेने (By Registered Post) या कार्यालयाकडे पाठवावी. त्याची पोच देण्यात येईल. साहित्य गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी कार्यालय स्वीकारणार नाही.

७) या कार्यालयाकडे पाठवावयाचे साहित्य स्वतंत्र असावे आणि तसे असल्याबद्दलची लेखी हमी लेखकाने देणे आवश्यक आहे.

८) नवलेखकांकडून आलेल्या साहित्याची तपासणी करण्यासाठी त्या त्या साहित्य प्रकारातील / विषयातील तज्ज्ञांची एक यादी मंडळ तयार करते. या साहित्यावर तज्ज्ञांचा अभिप्राय घेतला जातो. तज्ज्ञांना लेखकाचे नाव, पत्ता हा तपशील कळविला जात नाही. मंडळ त्याबद्दल गोपनियता राखते. तज्ज्ञांच्या अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्रायाच्या आधारे अनुदानाबद्दल निर्णय घेतला जातो.

...२/-

९) साहित्याच्या गुणवत्तेबद्दल तज्ज्ञांनी एकदा अनुकूल किंवा प्रतिकूल निर्णय दिला की तो अंतिम मानला जातो. या निर्णयाच्या योग्यायोग्यतेबाबत संबंधित लेखकाने कोणतेही स्पष्टीकरण मागितल्यास वा गुणवत्तेच्या निकषाबाबत विचारणा केल्यास त्याबाबतीत कोणतेही स्पष्टीकरण देण्यास मंडळ बांधील नाही. त्यामुळे एकदा निर्णय कळविल्यानंतर कोणताही पत्रव्यवहार लेखकांनी करु नये.

१०) अनुदानविषयक निर्णय झाल्यावर संबंधित लेखकाला तो निर्णय कळविला जाईल. हा निर्णय होण्यास साधारणत: एका वर्षाचा कालावधी लागतो. त्यामुळे एका वर्षाच्या कालावधीपर्यंत नवलेखकांनी यासंदर्भात मंडळाशी पत्रव्यवहार करु नये.

११) अनुदानासाठी प्राप्त झालेल्या साहित्यकृतीत इतर साहित्यिकांचे साहित्य समाविष्ट करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यास तो नवलेखक या योजनेतील अनुदानासाठी कायम अपात्र समजण्यात येईल.

१२) तज्ज्ञांनी अनुकूल अभिप्राय दिलेल्या व मंडळाने अनुदानाचा निर्णय घेतलेल्या साहित्याच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे अधिकार मंडळाकडे राहतील.

१३) अनुदान प्राप्त ठरलेल्या नवलेखकाच्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी मंडळाने रास्त ठरविलेल्या निर्मिती खर्चाच्या ७५% अनुदान प्रकाशकाला देऊन मंडळ पुस्तक प्रकाशित करते.

१४) पात्र ठरलेल्या पुस्तकाच्या फक्त ५०० प्रती छापण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

१५) या योजनेतील प्रकाशित पुस्तकाच्या ५० प्रती लेखकाला देण्यात येतील. यापेक्षा अधिक प्रती हव्या असतील व एकाचवेळी किमान १० प्रती लेखकाने खरेदी केल्या तर किंमतीच्या २५% सूट प्रकाशकांकडून मिळेल.

१६) अनुदानास पात्र ठरलेल्या पुस्तकाच्या नवलेखकाला मंडळाने ठरविल्यानुसार खालीलप्रमाणे प्रकाशकांकडून मानधन देण्यात येईल :-

| अ.क्र. | वाङ्मय प्रकार | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | कवितासंग्रह | ७५०/- |
| २ | कथासंग्रह | १०००/- |
| ३ | नाटक/एकांकिका | ७५०/- |
| ४ | कादंबरी | १५००/- |
| ५ | बालवाङ्मय | ७५०/- |
| ६ | ललितगद्य / वैचारिक | १०००/- |

१७) परिक्षकांचा अभिप्राय अर्जदार / लेखकांना कळविण्यात येत नाही.
१८) परीक्षकांकडून नकार मिळालेल्या लेखनाचा अनुदानासाठी पुनर्विचार केला जात नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१९) मंडळाने प्रकाशनार्थ न स्वीकारलेले साहित्य कोणत्याही परिस्थितीत लेखकाला परत पाठविले जात नाही. त्यामुळे लेखकाने मंडळाकडे पाठविलेल्या आपल्या लेखनाची एक प्रत स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे.

२०) या योजनेअंतर्गत मंडळाकडे साहित्य पाठविण्याची मुदत दि. १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी, २०२५ राहील.
अनुदान अर्ज व माहितीपत्रक तसेच अधिक माहितीसाठी पत्रव्यवहाराचा पत्ता :-

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
दूरध्वनी क्र. ०२२ २४३२ ५९३१
वेबसाईट - **http://sahitya.marathi.gov.in**

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
## नवलेखक अनुदान योजनेचा अर्ज

स्वसाक्षांकित
छायाचित्र

१) लेखकाचे नाव :
(ई-मेल आयडीसह)

२) जन्म दिनांक :

३) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :

४) मोबाईल (भ्रमनध्वनी) क्र. / दूरध्वनी क्र. :

५) ज्या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी अनुदानाची मागणी
आहे त्या पुस्तकाचा वाङ्मयप्रकार व त्याची पृष्ठसंख्या

६) सादर करीत असलेले साहित्य भाषांतरित /
रुपांतरित/आधारित आहे का ?

७) या योजनेद्वारे यापूर्वी मंडळाचे
अनुदान मिळाले आहे काय ?

८) यापूर्वी अन्य रितीने (मंडळाच्या अनुदानाशिवाय)
लेखकाची पुस्तके प्रकाशित झाली आहेत काय ?

मी शपथपूर्वक सांगतो/सांगते की, वर लिहिलेली सर्व माहिती खरी आहे. माझे आजवर एकही पुस्तक प्रकाशित झालेले नसल्यामुळे या अर्जाने ज्या पुस्तकासाठी अनुदान मागितले आहे ते माझे पहिले पुस्तक आहे. हे पुस्तक भाषांतरित/रुपांतरित किंवा आधारित नाही. हे सर्वस्वी माझेच लिखाण आहे. वरील माहिती कोणत्याही बाबतीत खोटी आहे असे नंतर आढळून आल्यास मला मंजूर झालेल्या अनुदानाची संपूर्ण रक्कम मंडळास परत करण्याची मी वैयक्तिक हमी देतो/देते. या योजनेतील पुस्तकाच्या अनुदानासंबंधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अंतिम निर्णय मला बंधनकारक राहील.

माझ्या साहित्याची एक प्रत माझ्याकडे आहे. त्यामुळे मंडळाने माझे साहित्य स्वीकारले नाही तरी मी ते परत मागणार नाही.

लेखकाची सही

(लेखक/लेखिकेचे नाव)

दिनांक :